# दिनांक 06/03/2025

1 खालापूर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 04/03/2025 रोजी 12:30 वा च्या सुमारास मौजे पंचशीलनगर नारंगी,येथील बौध्दविहार येथे ता.खालापुर येथे फिर्यादी हे त्याचे मोटार सायकलने जात असतांना बौध्दविहार येथे थांबले असता यांतील आरोपीत व एच.पी कंपनी मधील अज्ञात इसम हे बौध्दविहार मध्ये काय करत आहेत हे पाहण्यासाठी बौध्दविहार मध्ये प्रवेश केला असता आरोपीत हा त्याचे पायामध्ये चप्पल घालून होता तसेच एच.पी कंपनी तर्फे आलेला अज्ञात इसम हा सुध्दा त्याचे पायात बुट घालुन बौध्दविहार मध्ये का आले असे विचारले असता त्याने फिर्यादीस हिंदीमध्ये म्हणाले की मुझे देशमुख साहब ने बोला इसलिए शूज पहेनके अंदर आया असे बोलला म्हणून फिर्यादीने त्याचा हात धरुन बौध्दविहार मधून बाहेर काढीत असताना आरोपीत हा फिर्यादीस म्हणाला की, आम्ही बौध्दविहार मधील गाभा-या जवळ कुठे गेलो आहे असे उदधटपणे बोलून फिर्यादीस धमकी व दमदाटी केली व फिर्यादी यांचे आस्थास्थान असलेल्या बौध्दविहार मध्ये पायात बुट व चप्पल घालून फिर्यादी यांचे धार्मिक भावना दुखावून धार्मिक स्थळ अपविञ केले.

याबाबत खालापूर पोलीस ठाणे येथे गु.र.नं.72/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 298 सह अनुसुचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंध 1989 व सुधारणा अधिनीयम 2015 चे कलम 3(1)(यु), 3(1)(आर),3(2)(व्हीए) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास उपविभागीय पोलीस अधिकारी श्री.विक्रम कदम खालापूर विभाग हे करीत आहेत.

2. कर्जत पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 28/02/2025 रोजी 00:00 वा ते दि. 01/03/2025 रोजी 00:00 वा च्या दरम्यान मौजे सुरज फार्महाउस गणेगाव ता.कर्जत येथे फिर्यादी हे त्यांचे मालकीचे सुरज फार्महाउस गणेगाव ता.कर्जत येथे असताना त्यांचे मोबाईल वर मो.क्रं.9701183361 वरील अज्ञात ईसमाने व्हॉटसअपवर मेसेज पाठविले की मुझे सुपारी मिली है तुम्हे मारने के लिए मुझसे सुबह मे बात करो 3 लाख मिले हे सेटलमेन्ट करना हे तो बोलो और गलतीसे भी पुलीस के पास गये तो तुम्हे कडाव मे ही मार दुगा तुमको और तुम्हारे बेटे सुरज को और मुझे 1 लाख रुपये चाहिये तुमको तभी छोडुगा वरना पुरी फेमिली को ही मार दुगा याद रखना और मुझे कल तुमसे 1 लाख रुपये चाहिए नही दिये तो बच के रहना 10 दिन मे मार दुगा तुमको और मुझे पता हे तुम्हारे पास रिव्हाल्वर भी हे तो हमारे पास उससे कई गुना हत्यारे हे और तुम्हारा जो कडाव मे फार्म हाउस हे मिल लेगे कभी वही पर मुझे सुबह 12 बजे कॉल करो असे मेसेज करुन फिर्यादी

यांचेकडुन त्यांचे जिवाचे बदल्यात 1 लाख रुपये खंडणी मागुन व ती न दिल्यास फिर्यादी यांचे परिवाराला जिवे ठार मारण्याची धमकी दिली

याबाबत कर्जत पोलीस ठाणे येथे गु.र.नं.57/2025, भारतीय न्याय संहीता 2023 चे कलम 308(4) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई/कीर्तीकुमार गायकवाड हे करीत आहेत.

3. कर्जत पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 04/03/2025 रोजी 02:30 वा च्या सुमारास मौजे. किरवली ता.कर्जत येथे फिर्यादी रा.गणेश चाळ पवनपाडा कळवा पुर्व जि.ठाणे हे त्यांचे कंपनीचे मौजे किरवली ता.कर्जत येथे सुरु असलेल्या रेल्वेच्या कामाच्या ठिकाणी जे.सी.बी ने काम करीत असताना आरोपीत रा.कर्जत हा सदर ठिकाणी येवुन चालु जे.सी.बी अडवुन जे.सी.बी चे समोर उभा राहुन जे.सी.बी पुढे घ्यायचा नाही अशी धमकी देवुन धावत जे.सी.बी. चे वरती चढुन फिर्यादी यांचे खांदयावर लाथ मारुन त्यांना खाली खेचुन हाताबुक्कयाने मारहाण करुन येथे काम करायाचे नाही अशी धमकी देवुन शिवीगाळी केली.

याबाबत कर्जत पोलीस ठाणे येथे गु.र.नं.58/2025, भारतीय न्याय संहीता 2023 चे कलम 126(2),115(2), 352,351(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई/कीर्तीकुमार गायकवाड हे करीत आहेत.

4. कर्जत पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 05/03/2025 रोजी 14:05 वा च्या सुमारास मौजे कशेळे नाका ता.कर्जत येथे फिर्यादी रा.कामतपाडा, पो.आंबीवली ता.कर्जत हे फिर्यादी हे त्याचे गाडीमध्ये पॅसेंजर भरुन कशेळे येथुन आंबीवली येथे जात असताना दुसरे पॅसेंजर आल्यामुळे फिर्यादी यांच्या नंतरच्या गाडी नंबरवाला याला फिर्यादी यांनी फोन करुन सांगितले की ईथे जास्त पॅसेंजर आहेत तुझी गाडी घेवुन ये असे म्हणाले त्यानंतर फिर्यादी हे तेथुन जात असताना आरोपीत हे फिर्यादी यांच्या गाडीजवळ आले व फिर्यादी यांना शिवीगाळी करायला लागले व आरोपीत हे फिर्यादी यांना म्हणाले की मी ईथे असताना हे सगळे पॅसेंजर तिकडे पाठवयाचे कोणाच्या बापाची हिम्मत आहे. असे म्हणुन फिर्यादी यांची गळपट्टी धरली व हातातील लोखंडी रॉडने फिर्यादी यांच्या हातावर खांद्यावर व पाठीवर उपट मारुन शिवीगाळी करुन जिवे ठार मारुन टाकेन अशी धमकी दिली.

याबाबत कर्जत पोलीस ठाणे येथे गु.र.नं.59/2025, भारतीय न्याय संहीता 2023 चे कलम 118(1),115(2),352,351(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/अण्णासाहेब तोरवे हे करीत आहेत.

5. माणगाव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक दि. 04/03/2025 रोजी 19:15 वा ते दि. 05/03/2025 रोजी 19:15 वा च्या दरम्यान मौजे इंदापुर गावचे हददीत माही हॉटेल समोर मुंबई गोवा हायवे रोडवर ता.माणगांव येथे कोणीतरी अज्ञात चोरटयाने एकूण 18,000/-रुपये किमतीची मोटार सायकल स्वत:च्या आर्थिक फायदयाकरिता फिर्यादी रा.वडवली ता.महाड च्या सहमती शिवाय लबाडीच्या हेतुने चोरुन नेली.

याबाबत माणगाव पोलीस ठाणे येथे गु.र.नं.54/2025, भारतीय न्याय संहिता कलम 303 ,(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/फड्ताडे हे करीत आहेत.

6. महाड तालुका पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 02/03/2025 रोजी 22:25 वा ते दि. 03/03/2025 रोजी 22:25 वा च्या दरम्यान मौजे आडवली ते करंजाडी रेल्वे स्टेशन प्रवासा दरम्यान महिला फिर्यादी रा.साईक्रपा चाळ नं.01 महाराष्ट्र नगर आंबापाडा कुरार वीलेज मालाड पुर्वमुंबई , याअप गाडी 11004 तुतारी मेल एक्स्प्रेसचे बोगी नं.बी.3 मधील सीट नं.57 वर झोपुन प्रवास करीत असताना फिर्यादी यांनी सिटवर उशाजवळ ठेवलेली शोल्डर पर्स कोणीतरी आज्ञात चोरट-याने फिर्यादी यांचे झोपेचा फायदा घेवुन फिर्यादी यांचे नकळत उचलुन स्वत:चे फायद्याकरीता फिर्यादी यांचे संमतीशीवाय चोरुन नेले आहे. सदर गुन्ह्यातील एकूण 1,21,750/- रुपये किमतीचा माल चोरीस गेला आहे.

याबाबत महाड तालुका पोलीस ठाणे येथे गु.र.नं.08/2025, भारतीय न्याय संहिता कलम 2023 चे कलम 305 (c) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/फड्ताडे हे करीत आहेत.

7. कर्जत पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 05/03/2025 रोजी 18:00 वा च्या सुमारास मौजे. पोसरी,स्टॅन्डवर, ता.कर्जत येथे फिर्यादी व आरोपीत हे एकमेकांच्या परिचयाचे असुन फिर्यादी हे आदीवासी कातकरी समाजाचे आहेत हे आरोपीत यांना माहीत आहे.फिर्यादी व साक्षीदार हे पोसरी येथील स्टॅडवर उभे असताना त्यावेळी यातील आरोपीत हे पोसरी स्टॅन्डवर आले असता यांल साक्षीदार क्रं.1 यांनी आरोपीत क्रं.1 यास बैलगाडा शर्यत जिंकली का असे विचारले असता आरोपीत क्रं.1 याने आम्ही शर्यत जिंकु अगर हारु असे बोलले व त्या गोष्टीचा मनात राग धरुन आरोपीत क्रं.1 ते 3 यांनी यांतील फिर्यादी व साक्षीदार आदिवासी कातकरी समाजाचे आहेत हे माहीती असताना देखील आरोपीत क्र.1 याने मी तुमच्या कातोडी बायांना बुरगील असे जातीवाचक शब्द उच्चारुन फिर्यादी व साक्षीदार यांचा अपमान केला.तसेच आरोपीत क्रं.3 याने फिर्यादी यांना तु काय करशील,आम्ही तुला बघुन घेवु,असे बोलुन फिर्यादी यांचे डाव्या डोळयाचे खाली हाताने फाईट मारुन तसेच हाताबुक्यांनी मारहाण केली.तसेच आरोपीत क्र.3 याने साक्षीदार याचे डाव्या हाताचे बोटाला चावुन दुखापत केली व आरोपीत क्रं.1 ते 3 यांनी संगणमत करुन फिर्यादी व साक्षीदार यांना हाताबुक्यांनी मारहान करुन दुखापत केली व तुम्हा कातोडयांना जास्त माज आला आहे का ,तुम्हाला बघतोच, व साक्षीदार याला तुझे हातपाय तोडतो असे जातीवाचक शब्द उच्चारुन फिर्यादी व साक्षीदार याचा अपमान करुन बघुन घेण्याची धमकी दिली.

याबाबत कर्जत पोलीस ठाणे येथे गु.र.नं.60/2025, अनुसुचित जाती/जमाती अधिनियम , 1989 3(1)(r)(s), 3( 2) ( Va) , भा.न्या.संहिता कलम-117(2),115(2),351(1)(2),352,3(5). सह अनुसुचित जाती जमाती कायदा कलम-प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मा. उपविभागीय पोलीस अधिकारी सो.कर्जत श्री.धुळा टेळे हे करीत आहेत.

# वाहतूक केसेस

दिनांक 05.03.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 315 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून 3,10,000/-रुपये इतका दंड आकारला आहे.